# शेअर बाजारात 'आयपीओं'ची तेजी

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात सध्या 'आयपीओं'चा एकापाठोपाठ एक धमाका सुरू आहे. त्यामुळे गुंतवणूकदार



मालामाल होत आहेत, तर भांडवलदारांकडे मोठा निधी संकलित होत आहे. पंधरवाड्यापूर्वी टाटाच्या 'आयपीओ'ने धुमाकूळ घातल्यानंतर या आठवड्यातही तब्बल १२ नवीन 'आयपीओ' एकापाठोपाठ एक येत आहेत. त्यातून कंपन्या गुंतवणूकदारांकडून ४ हजार, ६०० कोटी रुपये उभारतील. गेल्या आठवडाभरात कंपन्यांनी चार हजार कोटी रुपये या माध्यमातून उभे केले होते. मुथूट मायक्रोफिन, सूरज इस्टेट डेव्हलपर्स, मोतीसन्स ज्वेलर्स, हॅपी फॉरेनर्स आदींच्या 'आयपीओ'मुळे बाजारात तेजी कायम आहे.